• वर्ष : ०३ • अंक : २४२ • पुणे • रविवार, दि. २४ मे २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313






# दैनिक आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे

पुण्यातील लोकप्रिय दैनिक




## दैनिक आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

## आपल्या जाहिरातींसाठी विश्वासार्ह व्यासपीठ

शासकीय, निमशासकीय, बँकिंग व सार्वजनिक जाहिरातींसाठी प्रभावी माध्यम

**आपल्या संस्थेच्या सर्व प्रकारच्या अधिकृत जाहिराती आता प्रसिद्ध करा दैनिक आरंभ पर्व मध्ये – विश्वास, पारदर्शकता आणि व्यापक वाचकवर्ग असलेले प्रभावी माध्यम.**

### आम्ही प्रसिद्ध करतो :

- शासकीय जाहिराती
- ग्रामपंचायत जाहिराती
- निविदा / टेंडर नोटीस
- जाहीर नोटीस
- बँकांचे ताळेबंद व लिलाव सूचना
- सहकारी संस्था जाहिराती
- शैक्षणिक संस्था सूचना
- कोर्ट / कायदेशीर नोटीस
- सार्वजनिक सूचना व प्रसिद्धीपत्रके
- व्यवसायिक व व्यापारी जाहिराती

### का निवडाल दैनिक आरंभ पर्व?

- ग्रामीण व शहरी भागात प्रभावी पोहोच
- कमी दरात उत्तम प्रसिद्धी
- जलद व अचूक प्रकाशन सेवा
- विश्वासार्ह आणि लोकप्रिय माध्यम
- डिजिटल व प्रिंट दोन्ही प्लॅटफॉर्मवर प्रसिद्धी




### आपल्या जाहिराती अधिकधिक लौकांपर्यंत पोहोचवण्यासाठी

## आजच संपर्क साधा!

संपर्क : प्रतिक गंगणे
7276314142
8657865702

ई-मेल : aparvinfo@gmail.com

**दैनिक आरंभ पर्व | “आपल्या विश्वासाचे वृत्तपत्र”**

## थोडक्यात पण महत्वाचे



## ‘अंतर्नाद’च्या प्रयोगाने रंगभूमीवर उभा केला भक्तिरसाचा जिवंत वारीसोहळा

पुणे (आरंभ पर्व) : भाऊसाहेब भोईर यांच्या ‘मोरया थिएटर्स’ निर्मित ‘अंतर्नाद – अ जर्नी टू द सोल’ या संगीत नाटकाच्या शुभारंभाच्या प्रयोगाने प्रेक्षकांना प्रत्यक्ष वारीचा अनुभव दिला. विठ्ठलराव तुपे नाट्यगृहात झालेल्या या प्रयोगाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विठ्ठल भक्ती, अध्यात्म, विज्ञान आणि आधुनिक विचार यांचा सुरेख संगम या नाटकातून अनुभवायला मिळाला. नाटक सुरू होण्यापूर्वीच नाट्यगृह परिसर हरिनामाच्या गजराने आणि अभंगांनी भक्तिमय झाला होता. प्रवेशद्वारावर संजावटीतून करून वारीचे वातावरण साकारण्यात आले होते. नाट्यगृहात प्रवेश करणाऱ्या प्रत्येक रसिकाच्या कपाळी चंदनाचा टिळा लावून त्यांचे स्वागत करण्यात येत होते. विविध क्षेत्रांतील मान्यवर, वारकरी संप्रदायातील मंडळी, कला रसिक आणि युवा प्रेक्षकांनी नाट्यगृह खचाखच भरले होते. तिसरी घंटा झाल्यानंतर ‘सांगा विठ्ठल माझा मला पावलं का?’ या अभंगाने नाटकाची सुरुवात होताच संपूर्ण सभागृह टाळ्यांच्या कडकडाटाने दुमदुमून गेले. लेखक विनोद रत्ना यांनी आधुनिक विचारांचा युवक ‘डीके’ अर्थात ज्ञानेश्वर कदम आणि त्याच्या अध्यात्माकडे होणाऱ्या प्रवासाची कथा प्रभावीपणे उभी केली आहे. सुरुवातीला वारीकडे अंधश्रद्धा म्हणून पाहणारा डीके विविध वारकऱ्यांच्या सहवासातून आत्मिक परिवर्तन अनुभवतो. “तुमच्या रक्तात पण वारी आहे,” हा संवाद नाटकाचा गाभा स्पष्ट करून जातो. विज्ञान आणि अध्यात्म यांचा संघर्ष आणि समन्वय संवादातून प्रभावीपणे मांडण्यात आला आहे.

## अनुसूचित जाती उपवर्गीकरणाला तीव्र विरोध; विधानसभेला घेराव घालणार




पुणे (आरंभ पर्व) : अनुसूचित जातीच्या (SC)'अ, ब, क, ड'उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावर राज्यातील दलित समाजात तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. या संदर्भात 'बार्टी' (डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था) कडे आतापर्यंत सुमारे ८० हजार ई-मेल प्राप्त झाले असून, त्यापैकी ८५% म्हणजेच ६५ ते ७० हजार ई-मेल हे या उपवर्गीकरणाच्या विरोधात आहेत. या पार्श्वभूमीवर, अनुसूचित जाती उपवर्गीकरण पुनर्विलोकन समितीचे राहुल डंबाळे यांनी विशेष मोहीम राबवून उपवर्गीकरणावर तीव्र आक्षेप नोंदविले आहेत. आता हा लढा अधिक तीव्र करण्यासाठी ३० जून रोजी मुंबई येथे विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान विधानसभेला घेराव घालण्याचे आंदोलन पुकारण्यात आले आहे. ३० जून रोजी मुंबईत होणाऱ्या या महा-घेराव आंदोलनाच्या पूर्वतयारीसाठी पुनर्विलोकन समितीच्या वतीने सध्या संपूर्ण महाराष्ट्रभर नियोजनाच्या बैठका सुरू आहेत. गाव, तालुका आणि जिल्हा पातळीवर समाजबांधवांना एकत्र करून या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले जात आहे. या बैठकांना राज्यभरातून मोठा प्रतिसाद मिळत असून आंदोलनाची जय्यत तयारी सुरू आहे.

## गुरुतत्त्वतर्फे हिमालयीन ध्यानयोग निःशुल्क वीडियो शिबिराचे आयोजन

पुणे (आरंभ पर्व) : गुरुतत्त्वतर्फे ‘समर्पण ध्यानयोग’ या हिमालयीन ध्यानयोगाच्या निःशुल्क वीडियो शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर दिनांक २३ मे ते ३० मे २०२६ दरम्यान दररोज दुपारी ४ ते ६ या वेळेत अटमोस्फिअर सोसायटी, आंबेगाव बु., पुणे येथील क्लब हाऊसमध्ये होणार आहे. या शिबिराचे आयोजन श्री शिवकृपानंद स्वामी फाउंडेशनतर्फे करण्यात आले असून सेवाधारी टीम, पुणे हे शिबिराचे संचालन करणार बी आहेत. या शिबिरामध्ये ‘समर्पण ध्यानयोग’चे प्रणेते सद्गुरू श्री शिवकृपानंद स्वामीजी यांच्या प्रवचनांचे वीडियो सादरीकरण करण्यात येणार आहे. ध्यानयोगाच्या माध्यमातून मानसिक व शारीरिक संतुलन, सकारात्मक ऊर्जा, आत्मविश्वास, एकाग्रता तसेच आध्यात्मिक अनुभूती यांचा लाभ सहभागी नागरिकांना मिळणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. विद्यार्थी, तरुण, महिला तसेच ८ वर्षांवरील मुलांनीही या शिबिरात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. हा ध्यानयोग जात, धर्म, भाषा, देश यांच्या पलीकडचा असून सर्वांगीण विकास हा त्यामागील मुख्य उद्देश आहे. शिबिर पूर्णपणे निःशुल्क असून नागरिकांनी सहकुटुंब सहभागी होऊन लाभ घ्यावा, असे आयोजकांनी नमूद केले. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९६०८८६६६१ वेबसाइट : gurutattva.org



## राजूरला एसटी बस सेवा सुरू; नागरिकांमध्ये समाधान

राजूर (आरंभ पर्व) : आदिवासी भागातील राजूर ता.जुन्नर येथे संदिपभाऊ मुंढे यांच्या पाठपुराव्यामुळे एसटी बस सेवा सुरू झाल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. ग्रामस्थांची गेली अनेक दिवसांची मागणी पूर्ण झाली आहे. यामुळे,शिक्षण व आरोग्य विभागाचे कर्मचारी,शालेय विद्यार्थी तसेच ग्रामस्थांची गैरसोय दूर झाली असल्याचे ग्रामपंचायत सदस्य संदिपभाऊ मुंढे यांनी सांगितले. मुंढे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे ही सुविधा उपलब्ध झाली असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. यापूर्वी गावाबाहेरील एसटी बस थांब्यावरून वेळेत बस मिळत नसल्यामुळे गावात ये-जा करण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. शासकीय कामकाजास विलंब होत होता. आता बससेवा थेट गावात सुरू झाल्यामुळे सर्व संबंधित अधिकाऱ्यांची वेळेची मोठ्या प्रमाणात बचत होणार असून शासकीय सेवा अधिक जलद होण्यास मदत होणार आहे. ज्येष्ठ नागरिक, महिला आणि विद्यार्थ्यांसाठी ही सेवा अत्यंत लाभदायक ठरणार आहे. ग्रामस्थांनी संदिपभाऊ मुंढे तसेच संबंधित अधिकाऱ्यांचे आभार मानले आहेत. सर्व कर्मचारी व प्रवाशांनी या सुविधेचा योग्य वापर करून वेळेचे पालन करावे अशी विनंतीही करण्यात आली आहे.

# स्व. राजीव गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने भारतरत्न, देशाचे माजी पंतप्रधान स्व. राजीवजी गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले होते. कार्यक्रमात स्व. राजीव गांधी यांच्या प्रतिमेस पुणे जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्रीरंगनाना चव्हाण पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुणे जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्रीरंगनाना चव्हाण पाटील यावेळी बोलताना स्व. राजीव गांधी यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, देशाच्या प्रगतीसाठी आधुनिक तंत्रज्ञान, संगणकीकरण आणि युवकांना राजकारणात संधी देण्याचे मोठे काम राजीव गांधी यांनी केले. भारताला २१व्या शतकाकडे नेण्याचे स्वप्न त्यांनी पाहिले आणि त्या दिशेने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. ते पुढे म्हणाले की, पंचायतराज व्यवस्था मजबूत करून ग्रामीण भागातील लोकशाही अधिक सक्षम करण्यासाठी स्व. राजीव गांधी यांनी प्रयत्न केले. दूरसंचार क्रांती, माहिती तंत्रज्ञान आणि शिक्षण क्षेत्रात त्यांनी घेतलेल्या निर्णयांचा देशाला मोठा फायदा झाला. त्यांच्या दूरदृष्टीमुळे आज भारत जागतिक स्तरावर तंत्रज्ञान क्षेत्रात सक्षमपणे उभा आहे.

कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनीही स्व. राजीव गांधी यांच्या कार्याला उजाळा देत त्यांच्या विचारांवर चालण्याची गरज व्यक्त केली. समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन विकासाचा मार्ग स्वीकारणे, युवकांना संधी उपलब्ध करून देणे आणि देशाच्या एकात्मतेसाठी कार्य करणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असे मत व्यक्त करण्यात आले.

यावेळी उपस्थित नवनियुक्त शिरूर लोकसभा अध्यक्ष कमलाकर दादा सातव, सोपानराव म्हस्के, आळंदी शहराध्यक्ष संदीप नाईकरे पाटील, अशोक मातेरे, वैभव यादव अध्यक्ष शिरूर तालुका, कैलास बापू सातव, आप्पासाहेब सातव, नितीन सातव, एम.डी. पाखरे, अक्षय सातव, आकाश सातव, रोहित ढमढरे .काँग्रेस पक्षाच्या विविध पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांनी स्व. राजीव गांधी यांच्या स्मृतींना अभिवादन केले.

## आमदार शेखर निकम यांची अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांशी चर्चा

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

राज्यात वाढत्या ऑनलाइन औषध विक्रीमुळे सार्वजनिक आरोग्य, रुग्ण सुरक्षा तसेच अधिकृत औषध विक्रेत्यांसमोर निर्माण झालेल्या समस्यांच्या पार्श्वभूमीवर आमदार शेखर निकम यांनी राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांची मंत्रालयात भेट घेत संबंधित विषयाकडे गांभीर्याने लक्ष वेधले. यापूर्वी चिपळूण तालुका औषध विक्रेते संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आमदार शेखर निकम यांची भेट घेऊन ऑनलाइन औषध विक्रीमुळे उद्भवत असलेल्या विविध अडचणींबाबत सविस्तर निवेदन दिले होते. या निवेदनाची गंभीर दखल घेत आमदार निकम यांनी हा विषय शासन दरबारी प्रभावीपणे मांडत



मंत्री नरहरी झिरवाळ यांच्याशी सविस्तर चर्चा केली. यावेळी ऑनलाइन माध्यमातून वैद्यकीय चिठ्ठीची योग्य पडताळणी न करता होणारे औषध वितरण, काही कंपन्यांकडून दिल्या जाणाऱ्या अवाजवी सवलती तसेच त्यामुळे पारंपरिक आणि अधिकृत औषध विक्रेत्यांवर होत असलेला आर्थिक परिणाम या विषयांकडे आमदार निकम यांनी मंत्र्यांचे लक्ष वेधले.

## धायरीत अंध बांधवांसाठी ‘स्मार्ट सेन्सर’चे वाटप

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

अंध व्यक्तींना दैनंदिन जीवनात, विशेषतः प्रवास करताना आणि चालताना येणारे अडथळे दूर व्हावेत, या उद्देशाने धायरी येथे एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. 'इन्फोसिस सेवा सहयोग', 'शिव वंदना मित्र परिवार' व सक्षम यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात सात अंध बांधवांना अत्याधुनिक सेन्सरचे (मशीन) वाटप करण्यात आले. धायरी येथील व्यंकटसाई होंडा सेल्स अँड सर्व्हिसेस च्या शोरूम मध्ये हा कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडला.



**बस प्रवास आणि चालणे होणार अधिक सुलभ**

अंध बांधवांना बसने प्रवास करताना किंवा रस्त्यावरून चालताना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यांच्या या अडचणींवर मात करण्यासाठी आणि त्यांच्या सुरक्षिततेसाठी या विशेष सेन्सर मशीनची निर्मिती करण्यात आली आहे. हे सेन्सर वापरल्यामुळे अंध व्यक्तींना चालताना समोरील अडथळे सुलभपणे समजणार आहेत.

या कौतुकास्पद उपक्रमासाठी प्राची महामुनी (सह सचिव, सक्षम पुणे महानगर), प्राज भिलारे (संस्थापक, शिव वंदना मित्र परिवार), संतोष कदम (व्यंकटसाई होंडा सेल्स अँड सर्व्हिसेस) तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. सामाजिक बांधिलकी जपत घेतलेल्या या पुढाकाराचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. या उपक्रमात दिव्यांग बांधवांसाठी देशपातळीवर कार्य करणाऱ्या 'सक्षम' या नामांकित संस्थेचे महत्त्वाचे सहकार्य लाभले. 'सक्षम' ही संस्था संपूर्ण देशात तब्बल २१ प्रकारच्या वेगवेगळ्या दिव्यांग घटकांसाठी अत्यंत मोलाचे आणि सातत्यपूर्ण काम करत आहे. दिव्यांगांचे जीवन स्वावलंबी बनवणे हा या संस्थेचा मुख्य उद्देश आहे.

## नऱ्हे मानाजीनगरमध्ये वाहतूक कोंडीने नागरिक त्रस्त

### प्रशासनाकडून तातडीने उपाययोजना करण्याची नागरिकांची मागणी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नऱ्हे मानाजीनगर येथील गणपती मंदिर परिसरातील वाढती वाहतूक कोंडी आता नागरिकांसाठी गंभीर समस्या बनली आहे. दररोज होणाऱ्या ट्राफिकमुळे नागरिकांना अक्षरशः मरण यातना सहन कराव्या लागत असून प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे स्थानिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.



गणपती मंदिर तसेच परिसरातील रस्त्यांवर मानाजीनगर परिसरातील वाढलेले अतिक्रमण, अरुंद मार्ग आणि नियोजनाचा अभाव यामुळे वाहतुकीचा पूर्णपणे बोजवारा उडाला आहे. सकाळी आणि सायंकाळी तर परिस्थिती अधिकच बिकट होत असून वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत आहेत. अनेक वेळा रुग्णवाहिकादेखील ट्राफिकमध्ये अडकत असल्याने रुग्णांच्या जीवाशी खेळ होत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे. शाळकरी विद्यार्थ्यांना वेळेत शाळेत पोहोचणे कठीण झाले असून ज्येष्ठ नागरिक, महिला आणि कामगार वर्गाला रोज मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. या सततच्या समस्येमुळे अनेक नागरिकांनी आपले फ्लॅट विकून इतर भागात स्थलांतर केल्याची माहितीही समोर येत आहे. स्थानिक नागरिकांनी प्रशासनावर नाराजी व्यक्त करत “अतिक्रमण हटवा, वाहतूक सुरळीत करा” अशी जोरदार मागणी केली आहे. नागरिकांच्या मते, केवळ बैठका आणि आश्वासने देऊन समस्या सुटणार नाही; प्रशासनाने तातडीने अतिक्रमण हटवून कायमस्वरूपी उपाययोजना करणे गरजेचे आहे.

“नागरिकांचा संयम आता संपत चालला आहे. आम्हाला फक्त आश्वासने नकोत, तर प्रत्यक्ष कृती हवी,” अशी भावना परिसरातील नागरिक नितीन घोलप यांनी व्यक्त केली.

दरम्यान, प्रशासन या गंभीर समस्येकडे किती लवकर लक्ष देणार आणि नागरिकांना वाहतूक कोंडीतून कधी मुक्तता मिळणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## भव्य दृश्यांसोबत भक्तीचा स्पर्श

### ‘कृष्णावतारम्’ ठरला वर्षातील सर्वात चर्चित चित्रपट

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भगवान श्रीकृष्णांच्या जीवनावर आधारित कृष्णावतारम् या चित्रपटाने सध्या देशासह जगभरात अभूतपूर्व लोकप्रियता मिळवली आहे. भव्य दृश्यरचना, प्रभावी कथानक आणि भक्तीभावाने परिपूर्ण सादरीकरणामुळे हा चित्रपट प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवत असून बॉक्स ऑफिसवरही विक्रमी कमाई करत आहे. भारतातील एकूण ग्रॉस कमाई ₹२४.८१ कोटींवर पोहोचली असून एकूण नेट कलेक्शन ₹२०.९६ कोटी इतके झाले आहे. गेल्या काही दिवसांत चित्रपटाच्या कमाईत मोठी वाढ झाली असून अनेक ठिकाणी हाऊसफुल्ल शो सुरू आहेत. विशेष म्हणजे हा चित्रपट केवळ मनोरंजनापुरता मर्यादित न राहता प्रेक्षकांना एक आध्यात्मिक अनुभूती देत आहे. थिएटरमध्ये श्रीकृष्णांच्या भजनांचा गजर, भावनिक प्रसंगांदरम्यान प्रेक्षकांचे अश्रू आणि आनंदोत्सवाचे वातावरण पाहायला मिळत आहे. हिंदीसोबतच तेलुगू आणि तमिळ भाषांतील आवृत्त्यांनाही प्रचंड प्रतिसाद मिळत असून भारताबाहेरील कॅनडा, दुबई, फ्रान्ससारख्या देशांमध्येही चित्रपटाची मोठी चर्चा सुरू आहे. सोशल मीडियावर चित्रपटाविषयीचे व्हिडिओ, प्रतिक्रिया आणि भक्तीमय वातावरण मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत. अनेक आध्यात्मिक गुरूंनी आणि सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांनी चित्रपटाचे कौतुक केले असून हा चित्रपट भारतीय संस्कृती, श्रद्धा आणि कुटुंबव्यवस्थेला नव्या पिढीसमोर प्रभावीपणे मांडत असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. कृष्णावतारम् आता केवळ एक चित्रपट नसून भक्ती, भावना आणि संस्कृतीचा जागतिक उत्सव बनला आहे.

## ३.८ किलो वजनाच्या बालकावर यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



ज्युपिटर हॉस्पिटल पुणे येथे अवघ्या ३.८ किलो वजनाच्या आणि ८ महिन्यांच्या बालकावर यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडली असून वैद्यकीय क्षेत्रात महत्त्वपूर्ण यश मिळाले आहे. अत्यंत कमी वजनाच्या बालकावर करण्यात आलेल्या या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियेमुळे त्या बालकाला नवजीवन मिळाले आहे. या प्रकरणातील विशेष बाब म्हणजे बाळाच्या आईने स्वतः पुढे येत जिवंत दाता म्हणून आपल्या यकृताचा काही भाग दान केला. योग्य वेळी घेतलेल्या या निर्णयामुळे बाळाचे प्राण वाचविणे शक्य झाले. हे बालक जन्मतःच प्रगत अवस्थेतील यकृत विकाराने ग्रस्त होते. पारंपरिक उपचार निष्फळ ठरत असल्याने तातडीने यकृत प्रत्यारोपण करणे आवश्यक झाले होते. मात्र, एवढ्या कमी वजनाच्या बालकावर शस्त्रक्रिया करणे डॉक्टरांसमोर मोठे आव्हान होते. बाळाचे अवयव, रक्तवाहिन्या आणि श्वसनमार्ग अत्यंत नाजूक असल्याने प्रत्येक टप्प्यावर अत्यंत अचूक नियोजन करण्यात आले. शस्त्रक्रियेदरम्यान आईकडून घेतलेल्या यकृताच्या भागाचे बाळाच्या शरीररचनेनुसार अचूक जुळवून प्रत्यारोपण करण्यात आले. द्रव संतुलन, रक्तस्राव नियंत्रण, तापमान नियंत्रण आणि शस्त्रक्रियेनंतरची स्थिती स्थिर राखण्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने काटेकोर नियोजन केले. मुख्य प्रत्यारोपण शल्यविशारद डॉ. बिपीन विभुते यांनी सांगितले की, “या प्रक्रियेसाठी प्रत्यारोपण शल्यविशारद, बाल यकृत तज्ज्ञ, भूलतज्ज्ञ आणि अतिदक्षता विभागातील डॉक्टरांमध्ये अत्यंत समन्वय आवश्यक होता.” मुख्य भूलतज्ज्ञ डॉ. मनीष पाठक म्हणाले, “अशा लहान बालकाला भूल देणे हे अत्यंत कठीण कामांपैकी एक आहे. रक्तदाब, तापमान किंवा द्रव संतुलनातील अगदी छोटासा बदलही गंभीर परिणाम करू शकतो.” बाल यकृत तज्ज्ञ डॉ. स्नेहवर्धन पांडे यांनी सांगितले की, “अशा शस्त्रक्रियेमध्ये बालकाच्या वजनातील प्रत्येक ग्रॅम महत्त्वाचा असतो. उपचाराच्या प्रत्येक टप्प्यावर अत्यंत अचूकता आवश्यक असते.”

## जुन्नरला परिचारिकांना ‘फ्लोरेन्स नाइटिंगेल स्मृती आदर्श परिचारिका पुरस्कार’ डिसेंट फाउंडेशनचा उपक्रम

- जुन्नरला परिचारिकांना ‘फ्लोरेन्स नाइटिंगेल स्मृती आदर्श परिचारिका पुरस्कार’



**जुन्नर (दै. आरंभ पर्व)**

रुग्णसेवेलाच ईश्वरकार्य मानून अहोरात्र सेवा बजावणाऱ्या, रुग्णांच्या आयुष्यात आशेचा किरण निर्माण करणाऱ्या परिचारिकांच्या त्यागाचा व समर्पणाचा गौरव करण्यासाठी जुन्नर येथे 'जागतिक परिचारिका दिना' निमित्त विशेष गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. जुन्नर पंचायत समितीचा आरोग्य विभाग, डिसेंट फाउंडेशन (पुणे) आणि सर्व परिचारिकांच्या संयुक्त विद्यमाने जुन्नर येथे हा सोहळा उत्साहात संपन्न झाला. यावेळी जुन्नर तालुक्यातील तेरा प्राथमिक आरोग्य केंद्रांतील उत्कृष्ट रुग्णसेवा करणाऱ्या उज्वला गवळी, रंजना कदम,मंगल नाडेकर, शुभांगी जंगले,पुजा भांगे,स्वाती राजदेव,मंगल खराडे, शितल शेळके,शिल्पा रावते, नुरजहाँ शेख,रेशमा वऱ्हाडी, संगिता शिंदे,उषा गोर्डे ह्या १३ परिचारिकांना 'फ्लोरेन्स नाइटिंगेल स्मृती आदर्श परिचारिका पुरस्कार' मान्यवरांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला.परिचारिकांसाठी यावेळी विविध मनोरंजक खेळ, फॅशन शो आणि लकी ड्रॉ अशा सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

या सोहळ्यासाठी जुन्नर पंचायत समितीच्या सभापती कमल शेळकंदे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अश्विनी कुळमेथे, डिसेंट फाउंडेशनचे संस्थापक जितेंद्र बिडवाई, सचिव एफ. बी. आतार, सरपंच नीता ताजणे आदी मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. आरोग्य विभागातील अधिकारी, कर्मचारी आणि तालुक्यातील परिचारिका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

जिल्ह्यात जुन्नर तालुक्यातील आरोग्य सेवेचं काम अतिशय उत्कृष्ठ असून यात सर्व परिचारिकांचा मोलाचा वाटा आहे असे मत तालुका आरोग्य अधिकारी डॉ.अश्विनी कुळमेथे यांनी व्यक्त केले. "रुग्णसेवा हिच खरी ईश्वर सेवा मानून आपण काम करत आहात. त्यामुळे तुमच्या सेवेला आमचा सलाम आहे ." “सेवा परमो धर्मो“ हे ब्रीद वाक्य घेऊन आपण रुग्णांची सेवा करता .औषधा सोबतच मायेच्या स्पर्शाने आणि आपुलकीच्या दोन शब्दांनी रुग्णाला आजारपण विसरायला लावणारी व्यक्ती म्हणजे परिचारिका आहे." जितेंद्र बिडवई,संस्थापक डिसेंट फाउंडेशन

सूत्रसंचालन अमोल पानसरे यांनी केले.रंजना कदम यांनी आभार मानले. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी सुनीता गाडेकर, उज्वला गवळी,अनिता कसार, संगीता बनकर ,प्रीती झगडे, डिसेंट फाउंडेशनचे पदाधिकारी, आरोग्य विभागाचे कर्मचारी आणि जुन्नर तालुक्यातील परिचारिका भगिनींनी अथक परिश्रम घेतले. या उपक्रमाबद्दल आरोग्य विभाग तसेच डिसेंट फाउंडेशनचे अनेकांकडून कौतुक केले जात आहे.

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
रविवार, दि. २४ मे २०२६








## थोडक्यात पण महत्वाचे



### शिवणे-धायरी मंडल भाजपची मासिक बैठक उत्साहात पार

पुणे (आरंभ पर्व) : शिवणे-धायरी मंडल भाजपची मासिक बैठक खडकवासला मतदारसंघाच्या प्रभारी मनीषा लडकत यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात पार पडली. बैठकीत आगामी कार्ययोजना, संघटनात्मक बळकटीकरण, स्थानिक समस्या सोडवणे, विविध विकासकामे तसेच पक्षाच्या संघटनात्मक कार्यपद्धतीवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करून पक्ष अधिक मजबूत करण्याचा निर्धार व्यक्त केला. तसेच नवनिर्वाचित खडकवासला मतदारसंघाच्या प्रभारी मनीषा लडकत आणि ओबीसी मोर्चाचे शहर सरचिटणीस रमेश गायकवाड यांचा मंडलाच्या वतीने सत्कार करण्यात आला. बैठकीस मंडलाध्यक्ष विजय मते, नगरसेवक सुभाष नाणेकर, नगरसेविका धनश्री कोल्हे, महिला मोर्चा अध्यक्षा मनिषा मोरे, किसान मोर्चा अध्यक्ष अरुण दांगट, युवा मोर्चा अध्यक्ष निखिल धावडे, ओबीसी मोर्चा सरचिटणीस रमेश गायकवाड, पुणे जिल्हा उपाध्यक्ष अनिल मते, शहर सरचिटणीस रोहिणी रहाणे, सरचिटणीस सायली भोसले, काजल हगवणे, गौतमी कांबळे, स्मिता पासलकर, वैशाली रणधीर, राधा कनोजिया नरसिंग लगड, यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. या बैठकीमध्ये किरण हगवणे, दत्तात्रय नाणेकर, सुभाष शिंदे, विशाल कदम, भगवान मोरे, प्रकाश आगाशे, भगवान शिंदे, मारुती धावडे, पराग कांबळे, सुनील पायगुडे, राजाराम दुपारगुडे, अभिजीत कांबळे, सचिन कांबळे, विकास भोसले, अजय बाबर, ईश्वर कदम, अरविंद मांजरे, अंकित कोल्हे, विलास नाणेकर, ऋत्विक मोरे, अनिकेत थापा, रुपेश थोरात, गुणवंत वागलावे, संतोष दरेकर व पदाधिकारी यांनीही सहभागी होत विविध विषयावर आपले मत व्यक्त केले..

### ‘अपोलो नेस्ट – मातृत्वाच्या प्रवासाची साथ’ उपक्रमाचा शुभारंभ




पुणे (आरंभ पर्व) : मातृदिनानिमित्त अपोलो हॉस्पिटल्स पुणे येथे मातृत्वाचा सन्मान, कृतज्ञता आणि प्रेरणेचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला. समाजातील मातांच्या अमूल्य योगदानाला सलाम करण्यासाठी आयोजित विशेष कार्यक्रमात पुण्यातील अनेक मातांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. आनंद, उत्साह आणि आरोग्यविषयक जनजागृतीने भरलेला हा कार्यक्रम संस्मरणीय ठरला. या कार्यक्रमाला विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांची उपस्थिती लाभली. त्यामध्ये वैद्यकीय क्षेत्रातील अनुभवी तज्ज्ञ आणि मीरा परिचर्या गृहाच्या संचालिका डॉ. सुनीता पोटे, भारतातील पहिल्या महिला रिक्षाचालक सौ. शीला दावरे तसेच अभिनेते सिद्धार्थ चांदेकर यांच्या आई सौ. सीमा चांदेकर यांचा समावेश होता. मातृत्व, कुटुंब आणि सामाजिक जबाबदाऱ्या यांचा उत्तम समतोल साधत प्रेरणादायी कार्य करणाऱ्या या मान्यवरांचा विशेष सत्कार करण्यात आला. विविध पिढ्यांतील महिलांसाठी त्या प्रेरणास्थान असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. कार्यक्रमात मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मनीषा करमरकर यांनी मातांची जिद्द, ताकद आणि निस्वार्थ प्रेम याविषयी मनोगत व्यक्त केले. मातृत्वाच्या प्रत्येक टप्प्यावर महिलांना योग्य आरोग्यसेवा आणि भावनिक आधार मिळणे किती महत्त्वाचे आहे, यावर त्यांनी विशेष भर दिला.

### बजाज जनरल इन्श्युरन्सचा ‘एमएचसीपी एज+’ हेल्थ प्लॅन लाँच



पुणे (आरंभ पर्व) : Bajaj General Insurance या भारतातील आघाडीच्या प्रायव्हेट जनरल इन्श्युरन्स कंपनीने ‘माय हेल्थ केअर प्लॅन एज+’ (एमएचसीपी एज+) हा नवा हेल्थ इंडेम्निटी प्लॅन लाँच केला आहे. वाढत्या आरोग्यसेवा खर्चाच्या पार्श्वभूमीवर ग्राहकांना अधिक लवचिक, सानुकूलित आणि व्यापक संरक्षण देण्याच्या उद्देशाने हा प्रगत प्लॅन सादर करण्यात आला आहे. एमएचसीपी एज+ अंतर्गत ₹5 लाखांपासून ते ₹5 कोटींपर्यंत सम इन्श्युअर्डचे पर्याय उपलब्ध असून, एका पॉलिसी वर्षात अनलिमिटेड रिइन्स्टेटमेंटची सुविधा देण्यात आली आहे. त्यामुळे अनेक वेळा क्लेम झाल्यासही ग्राहकांचे संरक्षण कायम राहणार आहे. या प्लॅनमध्ये रूम भाडे, आयसीयू शुल्क, शस्त्रक्रिया, आधुनिक उपचार पद्धती, आयुष उपचार, हॉस्पिटलायझेशनपूर्व व नंतरचा खर्च, डे केअर प्रक्रिया, घरगुती हॉस्पिटलायझेशन, अवयव दात्याचा खर्च तसेच आपत्कालीन ॲम्ब्युलन्स सेवांचा समावेश करण्यात आला आहे.

### ‘आर्य नागार्जुन संग्रहालया’चा रौप्य महोत्सव उत्साहात संपन्न



पुणे (आरंभ पर्व) : बौद्ध इतिहास, संस्कृती आणि सामाजिक वारसा जपणाऱ्या ‘आर्य नागार्जुन संग्रहालया’च्या रौप्य महोत्सवी वर्षाचा सोहळा रविवारी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. ‘आंतरराष्ट्रीय संग्रहालय दिना’चे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या या विशेष कार्यक्रमात संग्रहालयाच्या २५ वर्षांच्या उल्लेखनीय प्रवासाचा आढावा घेण्यात आला. तसेच संग्रहालयाच्या जतन, संवर्धन आणि विस्तारासाठी योगदान देणाऱ्या विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.








## वाढत्या गुन्हेगारीवर लवकरच कार्यवाही करणार

### पोलीस आयुक्त अमितेश कुमार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला विधानसभा मतदारसंघातील विविध भागांमध्ये वाढत असलेल्या गुन्हेगारी, अमली पदार्थांची विक्री, अवैध दारू तसेच इतर घातक व्यसनांच्या अवैध व्यवसायांना आळा घालण्यासाठी आज पुणे पोलिस आयुक्त कार्यालयात महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली. पुण्याचे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांच्या उपस्थितीत ही बैठक पार पडली.

बैठकीस खडकवासल्याचे आमदार भीमराव तापकीर, भाजपा पुणे शहराध्यक्ष धीरज घाटे, नगरसेवक सचिन मोरे, हरिदास चरवड, अरुण राजवाडे, सचिन दोडके, सुभाष नाणेकर, भारतभूषण बराटे तसेच नगरसेविका अल्पना वरपे, जयश्री भूमकर, धनश्री कोल्हे, कोमल नवले यांच्यासह इतर स्थानिक नगरसेवक उपस्थित होते.

तसेच प्रदेश भाजपा ओबीसी मोर्चा सचिव दत्ताभाऊ कोल्हे, भाजप मंडल अध्यक्ष गणेश वरपे, विजय मते, ओबीसी मोर्चा सरचिटणीस रमेश गायकवाड, जिल्हा उपाध्यक्ष अनिल मते आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना आ .भीमराव तापकीर यांनी परिसरातील कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी, युवकांना व्यसनमुक्त आणि सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी पोलीस प्रशासनाने तातडीने प्रयत्न केले पाहिजे. अमली पदार्थ, अवैध दारू व इतर बेकायदेशीर व्यवसायांवर कठोर कारवाई करण्याची मागणी आ तापकीर व इतर सर्व लोकप्रतिनिधींनी मांडली. यावेळी पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी संबंधित घटनांवर तातडीने कारवाई करण्यात येईल तसेच खडकवासला मतदारसंघ आणि परिसरातील गुन्हेगारीवर प्रभावीपणे लगाम घालण्यासाठी पोलिस प्रशासन ठोस पावले उचलेल, असे आश्वासन दिले.

### महात्मा फुले वाडा राष्ट्रीय स्मारकासाठी

## कृती समितीची बैठक संपन्न

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



पुणे महापालिकेच्या वतीने महात्मा फुले वाडा राष्ट्रीय स्मारकासाठी जागा हस्तांतरण प्रक्रियेबाबत आज महत्त्वपूर्ण कृती समिती बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत स्थानिक नागरिकांच्या विविध मागण्या आणि समस्या ऐकून घेण्यात आल्या.

बैठकीदरम्यान महापालिका प्रशासन व राज्य सरकार नागरिकांच्या भावना आणि मागण्यांचा सकारात्मक विचार करून त्या ठिकाणी क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे भव्य दिव्य राष्ट्रीय स्मारक उभारण्याबाबत प्रयत्नशील असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

तसेच, जमीन हस्तांतरण प्रक्रियेदरम्यान कोणत्याही नागरिकावर अन्याय होणार नाही, याची ग्वाही प्रशासनाच्या वतीने देण्यात आली. स्थानिक रहिवाशांच्या पुनर्वसनासंदर्भात लवकरच उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्या यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात येणार असून नागरिकांना त्याच परिसरात राहण्याची योग्य सोय उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. महापालिकेच्या वतीने आयोजित या बैठकीस पुणे महानगरपालिकेचे उपायुक्त माधव जगताप, स्थानिक नगरसेवक तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच भिडेवाडा राष्ट्रीय स्मारक समितीचे अध्यक्ष निलेश गिरमे यांनाही विशेष आमंत्रित करण्यात आले होते. यावेळी नागरिकांनी विविध मागण्यांचे निवेदन समितीकडे सादर केले.

यावेळी भिडे वाडा राष्ट्रीय स्मारक समितीचे अध्यक्ष निलेश गिरमे म्हणाले, “महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे स्मारक हे केवळ पुण्याचे नव्हे तर संपूर्ण देशाच्या सामाजिक परिवर्तनाचे प्रेरणास्थान ठरणार आहे. स्मारक उभारताना स्थानिक नागरिकांवर कोणताही अन्याय होऊ नये, ही आमची प्रमुख भूमिका असून प्रशासनानेही त्याबाबत सकारात्मक भूमिका घेतली आहे.”

## डाबरकडून ‘अद्भुत औषधी वनस्पती पुदिना’च्या फायद्यांचा प्रचार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आयुर्वेदिक वनस्पतींचे फायदे जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्याच्या आपल्या ध्येयाला पुढे नेत भारतातील सर्वात मोठी विज्ञानाधारित आयुर्वेद कंपनी डाबर इंडिया लिमिटेड ने पुदिनाला एक ‘अद्भुत औषधी वनस्पती’ म्हणून प्रोत्साहन देण्यासाठी मोहीम सुरू केली आहे. पुदिना अँटिऑक्सिडंट्स आणि फायटोन्यूट्रिएंट्सने समृद्ध असून, विशेषतः कडक उन्हाळ्यात मानवी पोटासाठी अत्यंत लाभदायक ठरतो. उष्णतेच्या लाटा आणि वाढत्या तापमानामुळे उन्हाळ्यात आरोग्याच्या समस्या सातत्याने वाढताना दिसत आहेत. या वाढत्या हंगामी आरोग्य समस्यांवर उपाय म्हणून डाबरने दिवसभर उन्हात राहणाऱ्या आणि उन्हाळ्यातील सामान्य आजारांना बळी पडणाऱ्या लोकांसाठी पुदिनाच्या वापराचा प्रचार सुरू केला आहे. “आधुनिक काळातील अनेक आजारांवरील उत्तम उपाय आयुर्वेदाच्या ग्रंथांमध्ये दडलेले आहेत. पुदिनाचा इतिहास सुमारे ३,००० वर्षांपूर्वीचा असून त्याला ‘अद्भुत औषधी वनस्पती’ म्हणून ओळखले जाते, जी मानवी पचनसंस्थेसाठी अत्यंत उपयुक्त आहे. पुदिनामधील मेंथॉल पचनासाठी आवश्यक एन्झाइम्स सक्रिय करते, पोटातील स्नायूंना आराम देते आणि अपचन व पोटदुखीचा त्रास कमी करण्यास मदत करते. तसेच ॲसिडिटी आणि गॅसच्या समस्यांवरही ते प्रभावी मानले जाते,” असे डॉ. निकिता जगताप यांनी सांगितले.

## धायरी-शिवणे गुन्हेगारीमुक्त करण्याची नगरसेवकांची मागणी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



पुणे शहरातील वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी खडकवासला मतदारसंघाचे आमदार भीमराव तापकीर आणि पुणे शहर भाजप अध्यक्ष धीरज घाटे यांच्या नेतृत्वाखाली पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्यासोबत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत प्रभाग क्रमांक ३३ चे नगरसेवक सुभाष नाणेकर यांनी धायरी-शिवणे परिसर गुन्हेगारीमुक्त व सुरक्षित करण्याची मागणी केली. दिवसाढवळ्या होणारे खून, गांजा तस्करी, अवैध धंदे आणि वाढती गुन्हेगारी यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. तसेच परिसरातील अवैध व्यवसायांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी करत पोलीस आयुक्तांना निवेदन सादर केले. प्रभाग गुन्हेगारीमुक्त करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि नागरिकांच्या वतीने पूर्ण सहकार्य केले जाईल, अशी ग्वाहीही यावेळी देण्यात आली.

बैठकीला मंडल अध्यक्ष विजय मते, ओबीसी मोर्चा प्रदेश सचिव दत्ताभाऊ कोल्हे, ओबीसी मोर्चा पुणे शहर सरचिटणीस रमेश गायकवाड यांच्यासह खडकवासला मतदारसंघातील विविध पदाधिकारी आणि नगरसेवक उपस्थित होते.

आमदार भीमराव तापकीर आणि शहराध्यक्ष धीरज घाटे यांनीही धायरी-शिवणे परिसरातील सुरक्षा व्यवस्था अधिक मजबूत करण्याची मागणी पोलीस प्रशासनाकडे केली. पोलीस आयुक्त अमितेश गुप्ता यांनी या मागणीची गांभीर्याने दखल घेत लवकरच आवश्यक ती कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन दिल्याची माहिती सूत्रांनी दिली.

धायरी-शिवणे परिसरातील नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने ही बैठक महत्त्वपूर्ण मानली जात असून, आगामी काळात या भागात पोलिसांची विशेष मोहीम आणि कडक कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# पत्नी म्हणजे मोलकरीण नव्हे

**(दै. आरंभ पर्व)**




> मुंबई उच्च न्यायालयाच्या या निर्णयांनी कदाचित अनेक महिलांना आवाज मिळेल. अनेक घरांमध्ये सुरू असलेल्या न बोलल्या जाणाऱ्या अन्यायाला शब्द मिळतील. आणि कदाचित समाजालाही समजेल. पत्नी म्हणजे मोलकरीण नव्हे, तीही माणूसच आहे.

शाईचा प्रवास
— प्रतिक गंगणे —

भारतीय समाजात लग्न म्हणजे अजूनही अनेकांच्या नजरेत स्त्रीने “सर्व काही सांभाळण्याची” जबाबदारी स्वीकारणे, अशीच व्याख्या केली जाते. मुलगी कितीही शिकलेली असो, करिअर करणारी असो, स्वप्न पाहणारी असो; लग्नानंतर तिच्या हातात नकळत झाडू, भांडी, स्वयंपाकघर आणि अपेक्षांचा डोंगर दिला जातो. “सून” या भूमिकेत प्रवेश करताच तिच्या व्यक्तिमत्त्वापेक्षा तिच्या कामांची यादी मोठी होते. आणि या सगळ्यात तिच्या भावनांना, थकव्याला, स्वप्नांना अनेकदा किंमतच उरत नाही.

अशा वेळी मुंबई उच्च न्यायालयाने दिलेले दोन महत्त्वपूर्ण निर्णय केवळ कायदेशीर नाहीत, तर सामाजिक परिवर्तनाचे संकेत देणारे ठरले आहेत. “पत्नी ही मोलकरीण नाही” आणि “सुशिक्षित महिला आहे म्हणून पोटगी नाकारता येणार नाही” ही निरीक्षणे प्रत्यक्षात समाजाच्या मानसिकतेवर केलेली कठोर टिप्पणी आहे.

आजही अनेक घरांमध्ये घरकाम हे स्त्रीचेच कर्तव्य मानले जाते. पुरुष मदत करतो तर त्याचे कौतुक केले जाते; पण स्त्री घरकाम करत नाही तर तिच्या संस्कारांवर प्रश्न उपस्थित केले जातात. स्वयंपाक नीट नाही, घर आवरले नाही, वडीलधाऱ्यांना उत्तर दिले. एवढ्याने स्त्री “वाईट बायको” ठरते. अनेकदा या किरकोळ गोष्टींचे रूपांतर मानसिक छळात केले जाते.

मुंबईतील प्रकरणातही असेच झाले. पत्नीवर घरकाम न केल्याचे आरोप झाले आणि त्यावरून घटस्फोट मंजूरही झाला. पण उच्च न्यायालयाने हा निर्णय रद्द करत एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट अधोरेखित केली. विवाह हा सेवा करार नाही. पत्नी ही नोकराणी नाही. घरकाम ही दोघांची सामायिक जबाबदारी आहे.

हे निरीक्षण साधे वाटू शकते; पण भारतीय सामाजिक वास्तवात ते अत्यंत क्रांतिकारी आहे.

कारण आपल्या समाजात स्त्रीकडून “त्याग” अपेक्षित असतो, पण पुरुषाकडून “सहभाग” अपेक्षित नसतो. मुलगी नोकरी करून आली तरी तिने स्वयंपाक करावाच अशी अपेक्षा असते; पण पुरुषाने घरकाम केले तर तो “बायकोच्या तालावर नाचतो” असे टोमणे मारले जातात. समानतेच्या घोषणा केल्या जातात, पण घराच्या चार भिंतीत मात्र अजूनही स्त्रीला पारंपरिक चौकटीतच अडकवले जाते.

याहून गंभीर बाब म्हणजे महिलांच्या आर्थिक वास्तवाकडे पाहण्याची समाजाची दृष्टी. एखादी महिला पदवीधर किंवा उच्चशिक्षित आहे म्हणजे ती आर्थिकदृष्ट्या सुरक्षित आहे, असा सरसकट निष्कर्ष काढला जातो. पण प्रत्यक्षात अनेक महिलांना लग्नानंतर नोकरी सोडावी लागते, मुलांच्या जबाबदाऱ्या घ्याव्या लागतात, करिअरमध्ये खंड पडतो. काहींना घरातूनच नोकरी करण्यास विरोध होतो. अशा वेळी केवळ “ती शिकलेली आहे” म्हणून तिची पोटगी नाकारणे म्हणजे वास्तवाकडे डोळेझाक करणे होय.

न्यायालयाने बेरोजगारीच्या वास्तवाचाही उल्लेख करत अत्यंत संवेदनशील भूमिका घेतली. आज उच्चशिक्षित तरुणांनाही नोकऱ्या मिळत नाहीत, हे वास्तव आहे. मग महिलांकडून “स्वतः कमवा आणि स्वतःच सांभाळा” अशी अपेक्षा करणे कितपत योग्य आहे, हा प्रश्न न्यायालयाने अप्रत्यक्षपणे समाजासमोर ठेवला आहे.

या निर्णयांचे महत्त्व केवळ महिलांच्या बाजूने निकाल लागला म्हणून नाही; तर त्यांनी विवाहसंस्थेकडे पाहण्याची दृष्टी बदलण्याचा प्रयत्न केला म्हणून आहे. विवाह म्हणजे केवळ स्त्रीने निभावायची जबाबदारी नसून ती दोघांची समान भागीदारी आहे. स्त्री ही केवळ घरकाम करणारी व्यक्ती नसून तिच्याही भावना, स्वप्ने, थकवा आणि आत्मसन्मान आहेत.

आज गरज आहे ती कायद्याबरोबर मानसिकताही बदलण्याची. कारण न्यायालय निर्णय देऊ शकते, पण घराघरातील समानता समाजालाच निर्माण करावी लागणार आहे. स्त्रीला “सून” किंवा “बायको” या चौकटीत न पाहता एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्वीकारले, तरच खऱ्या अर्थाने समानतेचा प्रवास सुरू होईल.

## थोडक्यात पण महत्वाचे



### हिंदुस्तान झिंकच्या राजपुरा दरीबा संकुलाला केंद्रीय खाण मंत्र्यांची भेट

पुणे (आरंभ पर्व) : राजस्थानमधील राजपुरा दरीबा संकुलात केंद्रीय कोळसा व खाण मंत्री जी. किशन रेड्डी यांनी भेट देत भूमिगत खाणकाम, धातू निर्मिती प्रक्रिया आणि सामाजिक विकास उपक्रमांचा आढावा घेतला. या दौऱ्यात त्यांनी सिंदेसर खुर्द भूमिगत खाण तसेच दरीबा धातू प्रक्रिया संकुलाची पाहणी केली. सिंदेसर खुर्द खाण ही अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित भूमिगत खाण मानली जाते. येथे सुरक्षितता, दूरस्थ नियंत्रण प्रणाली आणि आधुनिक यंत्रसामग्रीचा वापर करून खाणकाम केले जाते. मंत्र्यांनी नियंत्रण विभागाला भेट देत प्रत्यक्ष कार्यपद्धतीची माहिती घेतली. महिला खाण बचाव पथकाचे प्रात्यक्षिक पाहून मंत्र्यांनी महिलांच्या सहभागाचे कौतुक केले. खाण क्षेत्रात सुरक्षितता, कौशल्यविकास आणि सर्वसमावेशकतेला कंपनीने दिलेले प्राधान्य उल्लेखनीय असल्याचे त्यांनी सांगितले. दरीबा धातू प्रक्रिया संकुलामध्ये खाणकामापासून धातू निर्मितीपर्यंतची एकात्मिक प्रक्रिया पाहून मंत्र्यांनी समाधान व्यक्त केले. कंपनीत मोठ्या प्रमाणावर महिला कर्मचारी कार्यरत असून विविध क्षेत्रांत त्यांचे नेतृत्व दिसून येत असल्याचेही त्यांनी नमूद केले.



### आचार्य श्रीमद् विजय योगतिलकसुरिश्वरजी महाराजांचे माणिकबागेत आगमन

धायरी (आरंभ पर्व) : सिंहगड रोडवरील माणिकबाग येथील श्री श्वेतांबर जैन मूर्तिपूजक संघाच्या वतीने नवग्रहयुक्त श्री कुंथुनाथ भगवान जैन मंदिरात सूरि शांती समुदायना महान सूर्य जिन-संयम कृपा प्राप्त अध्यात्म सम्राट प.पू. आचार्य देव श्रीमद् विजय योगतिलकसुरिश्वरजी महाराज यांचे मंगळवारी उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. यानिमित्त वडगाव पुल ते माणिकबाग जैन मंदिर दरम्यान भव्य मिरवणूक काढण्यात आली. ढोल-ताशे, बॅण्ड पथक, धार्मिक ध्वज, जयघोष आणि सजविण्यात आलेल्या रथामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला होता. महिला मंडळ, युवक मंडळ, ज्येष्ठ नागरिक तसेच विविध भागांतून आलेल्या हजारो भाविकांनी मिरवणुकीत सहभाग घेतला. धार्मिक घोषणांनी वातावरण भारावून गेले होते.

### इंडियन ऑइलने अखंड इंधन पुरवठ्याची दिली हमी

पुणे (आरंभ पर्व) : देशसेवा आणि जनसेवा हे ब्रीद कायम ठेवत, इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेडने देशभरात पेट्रोल (एमएस), डिझेल (एचएसडी) आणि एलपीजीचा अखंड पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी आपले ऑपरेशन्स आणि लॉजिस्टिक्स समन्वय सुरू ठेवला आहे. अनेक भागांमध्ये इंधनाच्या मागणीत झालेल्या तीव्र वाढीच्या पार्श्वभूमीवर ही पावले उचलण्यात आली आहेत. अलीकडील काळात, अनेक राज्यांमध्ये हंगामी कृषी कामकाज आणि पीक कापणी मोहिमेमुळे इंडियनऑइलला पेट्रोलियम उत्पादनांच्या मागणीत लक्षणीय वाढ अनुभवायला मिळाली आहे. याशिवाय, इतर पुरवठादारांच्या तुलनेत कमी किंमतीमुळे किरकोळ ग्राहकांचे इंडियनऑइल रिटेल आउटलेट्सकडे स्थलांतर तसेच संस्थात्मक आणि व्यावसायिक ग्राहकांचाही रिटेल इंधन केंद्रांकडे वाढता कल यामुळे अतिरिक्त मागणीचा दबाव निर्माण झाला आहे. इंडियनऑइल आपल्या विस्तृत देशव्यापी टर्मिनल्स, डेपो, पाइपलाईन्स, एलपीजी बॉटलिंग प्लांट्स आणि रिटेल आउटलेट्सच्या नेटवर्कद्वारे अखंड पुरवठा आणि वेळेवर पुनर्भरण कायम ठेवत आहे. "वी आर ऑलवेज देयर" या भावनेनुसार पुरवठा पथके, वाहतूक नेटवर्क, टर्मिनल ऑपरेशन्स आणि निवडक रिटेल आउटलेट्स 24x7 कार्यरत असून उत्पादनांची अखंड वाहतूक सुनिश्चित करत आहेत.

### हंगामा ओटीटीने नवीन ओरिजिनल सिरीज 'लूटेरी दुल्हन' लॉन्च केली




पुणे (आरंभ पर्व) : भारतातील प्रमुख डिजिटल मनोरंजन प्लॅटफॉर्मपैकी एक असलेल्या हंगामा ओटीटी ने 19 मे 2026 रोजी आपली नवीन ओरिजिनल सिरीज 'लूटेरी दुल्हन' लॉन्च केली आहे. ही मध्य प्रदेशच्या पार्श्वभूमीवर आधारित एक तीक्ष्ण आणि रोमांचक क्राइम ड्रामा सिरीज आहे. या सिरीजमध्ये पूजा ए गोर आणि सांविका या दोन अभिनेत्री प्रमुख भूमिकेत आहेत, तसेच मनमोहन तिवारीही दमदार भूमिकेत आहेत. ही सिरीज एका मोठ्या आणि उच्च-दावाच्या तपासासोबतच दोन अशा महिलांचे प्रभावी चित्रण दाखवते, ज्या अशा जगात आपला मार्ग शोधत आहेत जे कदाचित कधीच त्यांच्या साठी बनलेले नव्हते. 'लूटेरी दुल्हन' ही कथा मध्य प्रदेशात घडणाऱ्या विचित्र गुन्ह्यांच्या मालिकेभोवती फिरते, जिथे काही नवरे लग्नानंतर रातोरात अचानक गायब होणाऱ्या नवरीकडून लुटले जातात. सुरुवातीला लोक याकडे दुर्लक्ष करतात, पण सब-इन्स्पेक्टर संध्या यादव यांना यात एक पॅटर्न दिसतो आणि त्या या प्रकरणाचा शोध घेण्यास सुरुवात करतात. संध्या यादव ही शिस्तबद्ध आणि हुशार पोलीस अधिकारी आहे, जिला स्वतःला सिद्ध करायचे आहे. समाजातील लग्नाबद्दलच्या दबावाचा सामना करत ती या तपासात पूर्णपणे झोकून देते. तपासादरम्यान तिची भेट मायाशी होते. एक अत्यंत हुशार आणि चतुर फसवणूक करणारी महिला, जिने जगण्यासाठी गुन्हेगारीचा मार्ग निवडला आहे. माया एक असे नेटवर्क चालवते जे कायद्यापेक्षा एक पाऊल पुढे राहून पुरुषांना आपला शिकार बनवते. जसे-जसे संध्या मायाच्या जवळ पोहोचते, हा केस अधिक वैयक्तिक बनत जातो आणि त्यामुळे तिच्या मनातील असुरक्षितता, एकाग्रता आणि ती ज्या स्त्रीचा पाठलाग करत आहे.

# दररोज बदाम सेवन केल्याने चांगले परिणाम

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जर्नल ऑफ न्यूट्रिशन मध्ये प्रकाशित नव्या संशोधनानुसार आहारातील एक छोटासा बदल—दररोज बदाम सेवन—प्रीडायबिटीज असलेल्या मध्यम वयीन आशियाई भारतीय प्रौढांमध्ये मेंदूची कार्यक्षमता, चयापचय आरोग्य तसेच सूज (इन्फ्लेमेशन) आणि ऑक्सिडेटिव्ह स्ट्रेसशी संबंधित संकेतकांवर सकारात्मक परिणाम करू शकतो. जगभरात ६० कोटींहून अधिक लोक प्रीडायबिटीजने प्रभावित आहेत. ही स्थिती केवळ टाइप-२ मधुमेहाच्या वाढत्या धोक्याशीच नव्हे, तर मेंदूच्या कार्यक्षमतेतील घटाशीही संबंधित आहे.

नवी दिल्ली येथे करण्यात आलेल्या या २४ आठवड्यांच्या अभ्यासात ४० ते ६० वर्षे वयोगटातील प्रीडायबिटीज असलेल्या ६० आशियाई भारतीय प्रौढांचा समावेश करण्यात आला होता, ज्यांच्यात मेंदूच्या कार्यक्षमतेतील घटेची कोणतीही लक्षणे नव्हती. सर्व सहभागींस एशियाई भारतीयांसाठी निश्चित आहार मार्गदर्शक तत्त्वांनुसार संतुलित आहार घेण्याचा सल्ला देण्यात आला आणि त्यानंतर त्यांना दोन गटांमध्ये विभागण्यात



आले—नियंत्रण (कंट्रोल) गट आणि हस्तक्षेप (इंटरव्हेन्शन) गट. नियंत्रण गटाने नेहमीप्रमाणे संतुलित आहार सुरू ठेवला, तर हस्तक्षेप गटाला बदामांचा समावेश असलेला समान कॅलरीचा आहार देण्यात आला. या आहारात दररोज एकूण कॅलरीपैकी सुमारे २०% हिस्सा बदामांचा होता, जो अंदाजे ३२–४२ ग्रॅम प्रतिदिन इतका होता. सहभागींचे आठवड्यातून दोनदा दूरस्थ निरीक्षण करण्यात आले आणि दर चार आठवड्यांनी प्रत्यक्ष तपासणी करण्यात आली. अभ्यासाच्या सुरुवातीला आणि शेवटी मेंदूची कार्यक्षमता, रक्तातील साखरेची पातळी, HbA1c, रक्तातील लिपिड्स, वजन, BMI आणि कंबरेचे मापन यांचे मूल्यांकन करण्यात आले.

अभ्यासाच्या शेवटी, बदाम सेवन करणाऱ्या गटात निर्णयक्षमता आणि माहिती प्रक्रिया गती यांसारख्या मेंदू कार्यक्षमतेशी संबंधित महत्त्वाच्या पैलूंमध्ये सुधारणा दिसून आली. तसेच उपाशीपोटी रक्तातील साखर, जेवणानंतरची साखर आणि HbA1c यामध्ये सुधारणा झाल्यामुळे रक्तातील साखर नियंत्रणही अधिक चांगले असल्याचे आढळले. याशिवाय वजन, शरीरातील चरबी, BMI, कंबरेचा घेर, एकूण कोलेस्ट्रॉल आणि LDL कोलेस्ट्रॉलमध्येही लक्षणीय घट दिसून आली. सूज आणि ऑक्सिडेटिव्ह स्ट्रेसशी संबंधित संकेतकांमध्येही सुधारणा आढळली. यापूर्वीच्या अभ्यासांमध्येही आशियाई भारतीय प्रीडायबिटीज आणि टाइप-२ मधुमेह रुग्णांमध्ये बदाम सेवनामुळे रक्तातील साखर नियंत्रण आणि शरीररचनेत सुधारणा होऊ शकते, असे दिसून आले होते. हा पहिलाच अभ्यास होता ज्यामध्ये प्रीडायबिटीज असलेल्या मध्यम वयीन आशियाई भारतीय प्रौढांमध्ये मेंदू कार्यक्षमतेवर बदामांचे संभाव्य परिणाम तपासण्यात आले. नवी दिल्लीतील फोर्टिस-सीडॉक सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर डायबिटीज, मेटाबॉलिक डिसीजेस अँड एंडोक्रिनोलॉजीचे अध्यक्ष आणि सह-अन्वेषक डॉ. अनूप मिश्रा यांनी सांगितले की, या प्राथमिक निष्कर्षांमुळे जगभरातील लाखो लोकांच्या मेंदू आरोग्यास पाठबळ मिळू शकते. त्यांच्या मते, आहारातील एक साधा बदल—दररोज थोड्या प्रमाणात बदामांचा समावेश—काही व्यक्तींमध्ये मेंदूचे आरोग्य सुधारण्यास मदत करू शकतो. डॉ. मिश्रा यांनी पुढे सांगितले की, "बदामयुक्त आहारामुळे रक्तातील साखर नियंत्रण आणि शरीराचे वजन यांसारख्या चयापचय आरोग्य निर्देशकांमध्येही सुधारणा दिसून आली. हे बदल एकत्रितपणे प्रीडायबिटीजचे टाइप-२ मधुमेहात रूपांतर होण्याचा धोका कमी करण्यास मदत करू शकतात, जो पुढे जाऊन स्मृतिलोप (डिमेन्शिया) च्या वाढलेल्या धोक्याशी संबंधित आहे." रितिका समद्दार यांनी सांगितले की, प्रीडायबिटीज आणि जीवनशैलीशी संबंधित आजार वाढत असताना बदामांसारखा साधा आहार पर्याय मेंदू आणि चयापचय आरोग्य दोन्हीला आधार देऊ शकतो. मेंदू कार्यक्षमता, रक्तातील साखर नियंत्रण, वजन आणि कोलेस्ट्रॉलमध्ये सुधारणा ही बदामांची 'सुपरफूड' म्हणून भूमिका अधिक दृढ करतात.

## मधुकर पाचपुते यांची पुणे जिल्हा सरचिटणीस पदी नियुक्ती



**दौंड (दै. आरंभ पर्व)**

बोरीबेल गावचे माजी ग्रामपंचायत सदस्य ह.भ.प. मधुकर महाराज पाचपुते यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गट अध्यात्मिक वारकरी आघाडी पुणे जिल्हा सरचिटणीस पदी राज्य प्रमुख ह.भ.प.दत्ता महाराज दोन्हे पाटील यांच्यावतीने सहीचे पत्र आमदार रोहित दादा पवार यांच्या हस्ते देण्यात आले, मधुकर महाराज पाचपुते हे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रामध्ये अनेक दिवसापासून कार्य करत आहेत, या निवडीमुळे मधुकर महाराज पाचपुते यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे, यापूर्वीही त्यांना अनेक पुरस्कार मिळालेले आहेत, यावेळी नवनिर्वाचित पुणे जिल्हा सरचिटणीस मधुकर महाराज पाचपुते म्हणाले की, आध्यात्मिक वारकरी आघाडी यांच्या वतीने भाविकांच्या तसेच नागरिकांच्या समस्या सोडवले जातील यासाठी प्रयत्न करणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

### आज 'दे दे प्यार दे २'चा वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमिअर

**मुंबई (दै. आरंभ पर्व) :** हास्य, प्रेम आणि कौटुंबिक मनोरंजनाचा धमाल प्रवास अनुभवायला सज्ज व्हा! 'दे दे प्यार दे 2'चा वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमिअर ह्या रविवारी, 24 मे रोजी दुपारी 12 वाजता झी सिनेमावर होणार आहे. विनोद आणि नाट्याचा आणखी मसाला घेऊन आलेल्या या सीक्वेलमध्ये, आई-वडिलांची संमती मिळवण्यासाठी नायक-नायिकांनी केलेला हलकाफुलका आणि मजेशीर प्रयत्न दाखवण्यात आला आहे.

## इसुझू डी-मॅक्स एस-कॅबसाठी आकर्षक भाडेपट्टा सुविधा

**चेन्नई (दै. आरंभ पर्व)**

इसुझू मोटर्स इंडियाने इसुझू डी-मॅक्स एस-कॅबसाठी नवीन भाडेपट्टा योजना जाहीर केली आहे. व्यवसाय मालक आणि वाहन ताफा चालकांना वाहन मालकीच्या अतिरिक्त जबाबदाऱ्यांशिवाय अधिक सोयीस्कर आणि किफायतशीर पर्याय उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ही योजना सादर करण्यात आली आहे. टिकाऊपणा, विश्वासार्हता आणि उत्कृष्ट कामगिरीसाठी ओळखल्या जाणाऱ्या इसुझू डी-मॅक्स एस-कॅबसाठी ही सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. वाहन भाडेपट्टा पद्धतीकडे वाढता कल लक्षात घेऊन ग्राहकांना अधिक सुलभ आणि स्मार्ट पर्याय देण्यावर कंपनीने भर दिला आहे.



कंपनीच्या मते, या योजनेमुळे मोठी प्रारंभिक गुंतवणूक टाळता येणार असून वाहनाचे अवमूल्यन आणि पुनर्विक्रीशी संबंधित चिंता कमी होणार आहेत. तसेच रोख प्रवाहाचे नियोजन अधिक सुलभ होऊन आधुनिक आणि विश्वासार्ह वाहन ताफ्याचे व्यवस्थापन सोपे होणार आहे.

## इंडियन ऑईलकडून इंधनपुरवठा सुरळीत

### महाराष्ट्रात डिझेल मागणीत २७.९ टक्क्यांची वाढ

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

देशातील विविध भागांमध्ये इंधनाच्या मागणीत वाढ होत असतानाही इंडियन ऑईलकडून पेट्रोल, डिझेल आणि घरगुती गॅसचा पुरवठा सुरळीत सुरू असल्याची माहिती देण्यात आली आहे. वाढती मागणी लक्षात घेता कंपनीने वाहतूक व वितरण व्यवस्था अधिक सक्षम करून अखंड सेवा कायम ठेवली आहे.

१ मे ते २१ मे २०२६ या कालावधीत महाराष्ट्रातील डिझेल विक्रीत मोठी वाढ नोंदविण्यात आली आहे. राज्यात एकूण विक्री २ लाख ६२ हजार २३५ किलोलीटरवर पोहोचली असून मागील वर्षाच्या तुलनेत त्यात २७.९ टक्के वाढ झाली आहे.

नांदेडमध्ये सर्वाधिक ७२.४ टक्के वाढ नोंदली गेली असून परभणीमध्ये ५६.४ टक्के, हिंगोली आणि धाराशिवमध्ये प्रत्येकी ५५.१ टक्के वाढ झाली आहे. सांगलीमध्ये ४९.३ टक्के, यवतमाळमध्ये ४२.७ टक्के, बुलढाण्यात ४२.८ टक्के आणि सोलापुरात ४०.१ टक्के वाढ झाली आहे. पुण्यातही डिझेल विक्रीत १४.७ टक्के वाढ झाली आहे. ग्रामीण भागातील मशागत व कापणीची कामे, सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांकडील तुलनेने कमी दर आणि व्यावसायिक ग्राहकांचा वाढता कल यामुळे मागणीत वाढ झाल्याचे सांगण्यात आले आहे. अनेक संस्थात्मक ग्राहकांनीही इंधन पंपांमधून थेट खरेदी सुरू केल्याने अतिरिक्त मागणी निर्माण झाली आहे.

देशभरातील साठवण केंद्रे, वितरण केंद्रे, वाहिन्या, घरगुती गॅस भरणी केंद्रे आणि इंधन पंपांच्या माध्यमातून पुरवठा अखंड सुरू असल्याचे स्पष्ट करण्यात आले. वाहतूक व्यवस्था आणि निवडक इंधन पंप चोवीस तास सुरू ठेवण्यात आले असून राज्य प्रशासनाशी समन्वय साधून पुरवठा व्यवस्था सक्षम करण्यात आली आहे. देशभरात पेट्रोल, डिझेल आणि घरगुती गॅसचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याने नागरिकांनी घाबरून अतिरिक्त खरेदी करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. इंधन उपलब्धतेबाबतची माहिती केवळ अधिकृत माध्यमांवरूनच घ्यावी, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# 'प्रायॉरिटी पोस्टपेड' सेवा सुरू



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

गर्दीच्या ठिकाणी व्हिडिओ कॉल, फोटो अपलोड किंवा ई-मेल डाउनलोड करताना ग्राहकांना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी भारती एअरटेलने 'एअरटेल प्रायॉरिटी पोस्टपेड' या नव्या सेवेचा शुभारंभ केला आहे. कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी शशवंत शर्मा यांनी ही माहिती दिली. शाश्वत शर्मा म्हणाले, "गर्दीच्या ठिकाणी नेटवर्कचा अनुभव सातत्यपूर्ण राहावा यासाठी आम्ही विशेष प्रयत्न केले आहेत. ग्राहकांना व्हिडिओ कॉल, ई-मेल डाउनलोड किंवा फोटो अपलोड करताना येणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी आम्ही 'एअरटेल प्रायॉरिटी पोस्टपेड' सेवा सुरू केली आहे." ही सेवा कंपनीच्या 5G नेटवर्कमधील 'स्लायसिंग' या अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित आहे. या तंत्रज्ञानामुळे नेटवर्कमध्ये सुधारणा होऊन पोस्टपेड ग्राहकांना अधिक स्थिर आणि अखंड कनेक्टिव्हिटीचा अनुभव मिळणार आहे. पाश्चिमात्य देशांमध्ये वापरल्या जाणाऱ्या या तंत्रज्ञानाचा भारतात वापर सुरू होत असल्याचा आनंदही त्यांनी व्यक्त केला. कंपनीनुसार, 'एअरटेल प्रायॉरिटी पोस्टपेड' सुविधा सर्व पोस्टपेड प्लॅन्ससाठी उपलब्ध करण्यात आली आहे. सध्या पोस्टपेड वापरणाऱ्या ग्राहकांना हा लाभ आपोआप मिळणार आहे. तर प्रीपेड ग्राहकांना एअरटेल ॲप किंवा जवळच्या एअरटेल स्टोअरमार्फत पोस्टपेडमध्ये अपग्रेड करता येणार आहे.

ही सेवा वापरण्यासाठी 5G SA (स्टँड अलोन) सक्षम स्मार्टफोन आवश्यक असणार आहे. ग्राहकांनी आपल्या मोबाईलमध्ये अद्ययावत सॉफ्टवेअर व्हर्जन असल्याची खात्री करावी, असेही कंपनीने स्पष्ट केले आहे. तसेच, ग्राहकांना आपल्या फोनची सुसज्जता एअरटेल ॲपद्वारे तपासता येणार आहे.

ग्राहकांचा नेटवर्क अनुभव अधिक चांगला करण्यासाठी भविष्यात आणखी सुधारणा करण्याबाबतही कंपनी सकारात्मक असल्याचे शाश्वत शर्मा यांनी नमूद केले.

## पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रियेस प्रारंभ

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सोमैया विद्याविहार विद्यापीठाने (एसव्हीयू) शैक्षणिक वर्ष २०२६ साठी पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेचा प्रारंभ झाल्याची घोषणा केली आहे. विद्यापीठाने कला, वाणिज्य आणि विज्ञान या तिन्ही शाखांतील विद्यार्थ्यांकडून प्रवेशासाठी अर्ज मागविले आहेत. 'सोमैया विद्याविहार विद्यापीठ प्रवेश परीक्षा'(एसव्हीयूईटी) ही दिनांक ६ जून २०२६ रोजी आयोजित करण्यात येणार आहे. एसव्हीयूईटी ही विविध पदवीपूर्व




अभ्यासक्रमांमध्ये प्रवेशासाठीची एक महत्त्वाची अशी प्रवेश परीक्षा आहे. ही परीक्षा 'इंटरनेट-प्रॉक्टर्ड'(इंटरनेट-आधारित देखरेखीखाली) या पद्धतीने घेतली जाते. त्यामुळे उमेदवारांना घरातूनच परीक्षा देणे सुलभ होते.

## 'प्रायोरिटी पोस्टपेड' सेवा सुरू करत ग्राहकांना उत्कृष्ट नेटवर्क अनुभवाचा लाभ

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

भारती एअरटेलने आज 'प्रायोरिटी पोस्टपेड' ही नवी सेवा सुरू करण्याची घोषणा केली. ही सेवा 5G स्लायसिंग तंत्रज्ञानाचा वापर करून पोस्टपेड ग्राहकांना उत्कृष्ट आणि सातत्यपूर्ण नेटवर्क अनुभव प्रदान करते. काम, मनोरंजन किंवा ऑनलाइन सहयोगासाठी अखंड कनेक्टिव्हिटीवर अवलंबून असलेल्या व्यस्त ग्राहकांसाठी ही सेवा विशेषतः विकसित करण्यात आली आहे. या सेवेसाठी एअरटेलने आपल्या 5G नेटवर्कमध्ये स्लायसिंग तंत्रज्ञानाच्या प्रगत क्षमतांसह सुधारणा केली आहे. यामुळे नेटवर्क अधिक कार्यक्षम बनते; अधिक क्षमता निर्माण होते; तसेच ही क्षमता विशिष्ट पद्धतीने वापरून प्रायोरिटी ग्राहकांना




उत्कृष्ट अनुभव देणे शक्य होते. नेटवर्क क्षमतेचे बुद्धिमत्तापूर्ण आणि गतिशील विभाजन करून, एअरटेल उच्च ट्रॅफिकच्या परिस्थितीतही पोस्टपेड ग्राहकांना स्थिर, विश्वासार्ह आणि सातत्यपूर्ण अनुभव देत आहे. गेल्या वर्षभरात अमेरिका, सिंगापूर, युनायटेड किंगडम आणि मलेशिया यांसारख्या अनेक देशांमध्ये स्लायसिंग-आधारित 5G सेवा सुरू करण्यात आल्या आहेत.

# तुमची आवडती 'गायनॅक' पुन्हा ड्युटीवर हजर

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

हलक्याफुलक्या विनोदामुळे, सहज जोडून घेता येणाऱ्या व्यक्तिरेखांमुळे आणि आधुनिक स्त्रीजीवनाकडे प्रामाणिकपणे पाहणाऱ्या कथानकामुळे प्रेक्षकांची पसंती मिळवलेली 'हू'ज युवर गायनॅक?' ही लोकप्रिय कॉमेडी-ड्रामा मालिका आता नव्या सीझनसह परतत आहे. भारतातील आघाडीची मोफत, प्रीमियम आणि जाहिरात-आधारित व्हिडिओ स्ट्रीमिंग सेवा असलेल्या ॲमेझॉन एमएक्स प्लेयरने आज या बहुप्रतीक्षित दुसऱ्या सीझनचा ट्रेलर सादर केला. या नव्या सीझनमध्ये डॉ. विदुषी कोठारी पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या भेटीला येणार असून, अनेक वर्षांपासून




ज्या आयुष्याचे स्वप्न ती पाहत होती, त्या नव्या टप्प्याकडे तिची वाटचाल सुरू होताना दिसणार आहे. द व्हायरल फीव्हर (टीव्हीएफ) आणि गर्लियापा निर्मित या मालिकेत सबा आझाद पुन्हा प्रमुख भूमिकेत दिसणार असून, करिश्मा सिंह आणि आरॉन अर्जुन कौल यांच्यासह ही कथा जिथे थांबली होती, तिथूनच पुढे सरकणार आहे. हिमाली शाह दिग्दर्शित या नव्या सीझनमध्ये कुणाल ठाकूर, विभा छिब्बर आणि श्रुती सेठ यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत. 22 मे रोजी प्रदर्शित होणारा 'हू'ज युवर गायनॅक?' सीझन 2मधून रुग्णांसाठी, मित्रांसाठी आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे स्वतःसाठी उभे राहण्याची भावनिक आणि प्रेरणादायी कथा प्रेक्षकांसमोर सादर करण्यात येणार आहे. या ट्रेलरमधून डॉ. विदुषी कोठारी (सबा आझाद) हिच्या आयुष्यातील नव्या टप्प्याची भावनिक आणि मनाला भिडणारी झलक पाहायला मिळते. पहिल्या सीझनमधील घटनांनंतर तीन महिन्यांनी विदुषीने एकेकाळी अशक्य वाटणारे पाऊल उचलले आहे. स्वतःचे क्लिनिक सुरू करण्याचे अनेक दिवसांपासून जपलेले स्वप्न तिने अखेर पूर्ण केले आहे. मात्र स्वतःचे क्लिनिक चालवणे ही काही सोपी गोष्ट नाही.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.